Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- II FEBRUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# ब्रिटिश कालखंडातील भारतीय अर्थव्यवस्थेच्या अवस्था

**प्रा. रमेश कचरु शिंदे**
एम.ए.एम.एड.सेट (शिक्षणशास्त्र, इतिहास)
सरस्वती शिक्षणशास्त्र महाविद्यालय, किनवट, जि. नांदेड

इंग्लड मध्ये व्यापारी हेतूसाठी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना 1600 साली झाली. तेव्हाचे ब्रिटिश आणि 1947 साली भारत सोडून जाणारे ब्रिटिश यांच्यात कमालीचा फरक होता. या काळात ब्रिटिश समाजाचा चेहरामोहरा बदलत गेला. राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था विकसित होत गेली. या बदलाबरोबरच आर्थिक शोषणाचे स्वरुप बदलत गेले. हे शोषण तीव्र होत गेले. भारतीयांची या शोषणाविरुध्दची प्रतिक्रियाही बदलत गेली, तीव्र बनत गेली.

इंग्लंड हे एक प्रगत व्यापारी राष्ट्र होते. युरोपीय राष्ट्रांच्या वसाहतवादाच्या स्पर्धेत इंग्लंड आघाडीवर होते. सतराव्या आणि अठराव्या शतकात त्यांनी अनेक वसाहती मिळवल्या आणि आपला व्यापार संपन्न केला. आयातीपेक्षा निर्यातीला व त्याद्वारे होणाऱा नफा याला जास्त महत्व देणारे वाणिज्य तत्वज्ञान इंग्लंडमध्ये विकसित झाले.

**औद्योगिक क्रांती**

एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. नवी उत्पादनपध्दती आणि यंत्रसामग्री यांचा शोध लागला. कारखाना पध्दत विकसित झाली. प्रंचड प्रमाणात उत्पादन सुरू झाले. बाष्पशक्ती आणि विद्युतशक्तीच्या वापरामुळे हे शक्य झाले. "औद्योगिक क्रांती" ही केवळ एका देशाची क्रांती नव्हे, तर एका अर्थाने जगाची क्रांती होती. इंग्लंडमध्ये तिचा प्रांरभ झाला. साहाजिकच औद्योगिक प्रगती, आर्थिक संपन्नता आणि लष्करी सामर्थ्य यांसाठी इंग्लंड ओळखले जाऊ लागले. त्यानतंर इंग्लंडमध्ये औद्योगिक भांडवलशाही स्थिरावली. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडच्या आणि औद्योगिक दृष्टया प्रगत अशा पाश्चिमात्य राष्ट्रांच्या आर्थिक गरजा वाढल्या. मोठे उद्योग उभारण्यासाठी प्रंचड भांडवल आवश्यक होते. नव्या यंत्रांची राक्षसी भूक शमवण्यासाठी मुबलक आणि स्वस्त दरातील कच्चया मालाची गरज होती. त्यामुळे उत्पादनासाठी आवश्यक असणारा कच्चा माल आणि तयार झालेल्या प्रंचड मालाला पुरेशी बाजारपेठ या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या आधिपत्याखाली आसणाऱ्या वसाहतींचा आपल्या फायदयासाठी ब्रिटिशांनी अरेरावी वापर केला.

**भारतीय अर्थव्यवस्थेचे शोषण**

ब्रिटिश जेव्हा भारतात आले तेव्हा ते भारतीय राज्यकर्त्यांकडे व्यापारी सवलतींची प्रार्थना करणारे याचक होते. मुघल सम्राट जहांगीर याने 1618 मध्ये सर थॉमस रो याला अशा सवलतींची सनद दिली. त्यानंतर या शांततामय व्यापारी धोरणाचे पुढे आक्रमक बनू लागले.ब्रिटिशांच्या राजकीय आकांक्षा बळावत जाऊन अखेर त्यांनी बंगालमध्ये भक्कम पाय रोवले. प्लासी (1757) व बक्सार (1764) या लढायांमधील विजय आणि बंगालमध्ये मिळालेले दिवाणी हक्क यांमुळे बंगालची पध्दतशीर लूट ब्रिटिशांनी सुरु केली. येथूनच पहिल्या अवस्थेची सुरुवात झाली.

**वाणिज्यवादी अवस्था (1757 ते 1813)**

भारताशी व्यापारी संबंध प्रस्थापित केल्यावर ब्रिटिशांना प्रथम भारताशी समान पातळीवर व्यापार करावा लागत असे. भारतीय मालाची किंमत सोन्या चांदीच्या रुपाने मोजावी लागत असे. परंतु बंगालमध्ये ब्रिटिशांना दिवानी हक्क मिळाल्यानंतर हे चित्र बदलले. बंगालमध्ये गोळा केलेल्या महसुलातून एकीकडे ब्रिटिश आधिकाऱ्यांचे पगार भागू लागले आणि दुसरीकडे भारतीय पैशातूनच भारतीय माल विकत घेतला जाऊ लागला. साहजिकच ब्रिटिशांच्या सोन्या चांदीची बचत होऊ लागली आणि भारतीय मालाच्या व्यापारातून ब्रिटिशांना प्रचंड नफाही मिळू लागला. आयात - निर्यातीच्या व्यवहारात वसाहतींची पिळवणुक करुन नफा लाटण्याच्या वाणिज्यवादी प्रवृत्तीनुसार ब्रिटिशांनी त्यांच्या वर्चस्वाखालील भारतीय भूप्रदेशांची लूट सुरु केली. भारतीय विक्रेत्यांवर ब्रिटिशांच्या इच्छेनुसार विक्रीच्या किंमतीत लादल्या गेल्या. उत्पादनखर्चापेक्षाही कमी किंमतीत आपला माल ब्रिटिशांना विकणे या विक्रेत्यांना भाग पडत असे. त्याच मालाच्या व्यापारावर नफा मिळवून ब्रिटिश मात्र गबर होऊ लागले. अशा रितीने भारताचे शोषण होऊ लागले.

**खुल्या व्यापाराची अवस्था (1813 ते 1858)**

1813 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील व्यापारांची मक्तेदारी संपुष्टात आली. त्यामुळे ब्रिटिश भांडवलदार व व्यापाऱ्यांना व्यापारासाठी भारत अधिकच खुला झाला. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती या वेळेपर्यंत चांगलीच प्रगतिपथावर पोहोचली होती. इंग्लंडचे आर्थिक धोरण ब्रिटिश उद्योगधंद्याच्या विकासाला मुक्त अवसर देणारे होते. या उद्योगधंद्यासाठी लागणारा स्वस्त व मुबलक कच्चा माल भारतातून इंग्लंडमध्ये नेण्यात येऊ लागला आणि इंग्लंडमधला पक्का माल भारतीय बाजारपेठामध्ये खपवला जाऊ लागला. उदा. भारतातील कापूस मँचेस्टरच्या कापडगिरण्यांना पुरवला जात असे आणि कापडगिरण्यांमधील कापड भारतात विकले जात असे.

**आर्थिक साम्राज्यवादाची अवस्था (1858 पासून पुढे)**

1858 मध्ये इंग्लंडची भारतावरील पकड अधिकच दृढ झाली. 1857 चा उठाव दडपून टाकून ब्रिटिश राजसत्तेचा प्रत्यक्ष ताबा भारतावर निर्माण करण्यात आला. कंपनीचे राज्य संपले आणि इंग्लंडच्या राणीचे राज्य भारतात सुरु झाले. या सुमारास इंग्लंडमधल्या औद्योगिक क्रांतीचा पहिला टप्पा संपला होता. ब्रिटिशांचे अतिरिक्त भांडवल इंग्लंडऐवजी भारतात गुंतवण्यामूळे अधिक नफा मिळणार होता. स्पर्धा कमी असल्याने उद्योगाच्या विकासाला भरपूर वाव होता. तसेच भारतात मजुरीचे दर कमी असल्यामुळे नफयाचे प्रमाण वाढणार होते. त्यामुळे भांडवल-गुंतवणूक अधिक किफायतशीर ठरणार होती. 1853 मध्ये भारतात रेल्वे सुरु झाली होती. रेल्वेचे वाढते जाळे आणि दळणवळणाची आधुनिक साधने यांचा लाभही ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाला. विविध उद्योगधंदे, रेल्वे, मळे, खाणी, बँका यांमध्ये ब्रिटिशांनी भांडवल गुतंवले. सरकारी धोरणे भांडवल-गुतंवणुकीला आणि नफेखोरीला उत्तेजन देणारीच होती. शोषणासाठी ब्रिटिश भांडवलशाहीला भारताच्या रुपाने चांगले कुरणच मिळाले. 1933 मध्ये ब्रिटिशांची भारतातील भांडवल-गुतंवणूक एक अब्ज पौंडापर्यंत पोहोचली होती आणि ही गुतंवणूक इंग्लंडच्या एकूण परदेशी गुतंवणुकांच्या सुमारे एक चतुर्थांशइतकी होती.

**सारांश**

भारताचे शोषण करुन इंग्लंडची संपन्नता वाढवण्याचे धोरण वासाहतिक अर्थव्यवस्थेच्या या तीनही अवस्थांमध्ये ब्रिटिशांनी स्वीकारले होते. दर

अवस्थेगणिक शोषण तीव्र होत गेले. आर.के. गोपालकृष्णन यांनी एक मार्मिक विधान केले आहे. भारतावरील प्रभुत्वाआभावी इंग्लंडमधील शोध वाया गेले असते, असे त्यांना सुचवायचे आहे. थोडक्यात, भारताच्या शोषणातून इंग्लंडचे चांगलेच पोषण होत होते. ब्रिटिशांची शोषक भांडवलशाही प्रवृत्ती स्पष्ट करणारे काही उदगारही येथे लक्षात घ्यायला हवेत. मुंबईचा गव्हर्नर रिचर्ड टेंपल याने 1880 मध्ये लिहून ठेवले की, "इंग्लंडने भारत आपल्या ताब्यात ठेवलाच पाहिजे. कारण येथे ब्रिटिश सत्ता चिरंतन टिकेल या आशावादावर विसंबून ब्रिटिश भांडवल फार मोठया प्रमाणात या देशात गुंतवले गेले आहे."

आशाप्रकारे ब्रिटिशांनी आपल्या वसाहतवादी व साम्राज्यवादी धोरणाच्या जोरावर प्रथम भारतीय बाजारपेठेवर प्रभुत्व प्रस्थापित करुन भारतीय अर्थव्यवस्था जी कधीकाळी बहरलेली होती ती स्वत:च्या हव्यासापोटी तीचे हवे तसे शोषण करुन ती डबघईला आणली. त्यामुळे पहिल्या अवस्थेपासुन ते तिसऱ्या अवस्थेपर्यतंचा विचार केला असता आपल्याला त्याची प्रचिती होते.

**संदर्भ पुस्तके :**

1. आधुनिक भारत, जावडेकर, आचार्य शं.द., काँटिनेंटल प्रकाशन, पुणे, 1979
2. आधुनिक भारत, बिपिन चंद्रा, एनसीईआरटी, न्यु दिल्ली, 1985
3. आधुनिक भारत (1885-1947), सुमित सरकार, मॅकमिलन प्रकाशन, मद्रास, 1986
4. आधुनिक भारताचा इतिहास, प्रथमावृत्ती, महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर- 1985
5. आधुनिक भारताचा इतिहास, डॉ.अरुण जोशी - प्रा. ना.सी. दीक्षित-प्रा. मनोहर रा. कुलकर्णी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
6. समग्र भारताचा इतिहास, प्राचार्य य.ना. कदम, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती, नोव्हेंबर - 2013